क्र.पोमसं/३१/३९-४/मोवाअ-संगणक अग्रीम (२०२५-२६)/८२/२०२५ मुंबई, दि. १२/०२/२०२६

**विषय - लेखा अनुदान २०२५-२६**
**मागणी क्र.बी-११, मुख्यलेखाशिर्ष- " ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे" गौणशिर्ष-२०४, संगणक अग्रिमाबाबत.**

*********

## आदेश

शासन निर्णय, गृह विभाग, क्र.बीयुडी- ०६२५/प्र.क्र.७३/आस्था-१, दि.१७/०६/२०२५ अन्वये सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाकरिता शासनाने मागणी क्र.बी - ११ मुख्यलेखाशिर्ष "७६१०- शासकीय कर्मचारी इ.कर्जे" मधील गौणशिर्ष २०४- संगणक अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०१८५१) अतंर्गत या कार्यालयाच्या अधिपत्याखालील **घटक कार्यालयांना त्यांच्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांना संगणक अग्रिम वाटप करण्याकरिता एकूण रु. १२,४०,०००/- (अक्षरी रुपये बारा लाख चाळीस हजार फक्त) इतका निधी बी.डी.एस. प्रणालीवर सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

२. सदर शासन निर्णयानुसार शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या संबंधित विभाग प्रमुख/प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांना, शासन निर्णय वित्त विभाग, क्र.अग्रिम-१०११/ प्र.क्र.५०/२०११/विनियम, दि.०३/०२/२०१२ अन्वये अग्रीमाची रक्कम जास्तीत जास्त रु.२०,०००/- (रुपये वीस हजार फक्त) किंवा संगणक/लॅपटॉप/टॅबलेट संगणकाची प्रत्यक्ष किंमत, यापैकी जी कमी असेल त्या रकमेचे संगणक अग्रिम वाटप करावे.

३. विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्यांना शासन निर्णय वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, दिनांक १७/४/२०१५ अन्वये मुंबई वित्तिय नियम १९५९ मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या, तसेच वित्तिय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उप विभाग-एक, मधील अनुक्रमांक १३ नियम १३६,१३७ व १३९ अन्वये संगणक अग्रिम मंजूरीचे स्वतंत्र आदेश निर्गमित करावेत. त्यामध्ये शासन निर्णय वित्त विभाग क्र.अग्रिम-१०११/प्र.क्र. ५०/२०११/ विनियम, दि.०३/०२/२०१२ मधील विहित अटी/शर्तींचा समावेश करावा.

४. **विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुखांना सूचित करण्यात येते की, शासन वित्त विभाग, क्र. अग्रिम-१०११/ प्र.क्र.५०/ २०११/विनियम, दि. ०३/०२/२०१२ अन्वये विहित केलेल्या अटी व शर्तींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर शासन निर्णयातील अट क्र. ९ मधील विहित तरतुदीनुसार संगणक खरेदीबाबत आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे संगणक अग्रिम प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एका महिन्याच्या आत संबंधीत कर्मचाऱ्यांकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. तसे न केल्यास अग्रिम धारकाकडून अग्रिमाची संपूर्ण रक्कम १७.७५% व्याजदराने एक रकमी वसूल करण्यात येईल, असे मंजूरी आदेशात नमुद करावे. अग्रिम मंजूर करताना मुंबई वित्तीय नियम-१९५९ मधील नियम १२४(बी) व वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अग्रिम-१०९५/प्र.क्र. ७०/ ९५/विनियम, दि.२६.०९.१९९७ मध्ये नमूद तसेच, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लागू ठरणाऱ्या दंडनीय व्याजाचा उल्लेख मंजूरीच्या आदेशात करण्यात यावा.**

५. सदर निधीचा विनियोग पुर्णत:न केल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सविस्तर कारणे शासनास व लोकलेखा समितीस सादर करावी लागतात. तरी निर्देश देण्यात येत आहेत की, विभाग प्रमुख/प्रादेशिक कार्यालय प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांचे संगणक अग्रिम मंजूरी संबंधीचे आदेश त्वरीत निर्गमित करावेत. तसेच, आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित कोषागार कार्यालयास त्यासंबंधीची देयके सादर करुन सदरची देयके त्वरीत पारित करुन घ्यावीत. तसेच संबंधीत अधिकारी/ कर्मचाऱ्याला अग्रिम रक्कम अदा करणे ही सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधित घटक प्रमुखांची असल्यामुळे त्यांनी सदर प्रकरणांची तातडी व गांभीर्य लक्षात घेऊन व या प्रकरणी वैयक्तीकरित्या लक्ष देऊन त्यांचे कार्यालयातील लेखा विषयक कामकाज हाताळणारे लेखा अधिकारी/ सहाय्यक लेखा अधिकारी /लिपिक वर्गीय अधिकारी /कर्मचारी यांनी स्वत: लक्ष देऊन त्याप्रमाणे विहीत कालावधीत अचूक व परिपूर्ण कामे करण्याबाबत सक्त सूचना द्याव्यात. जेणेकरुन शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीचा विनियोग पूर्णत: होईल. तसेच शासन वित्त विभाग, क्र. अग्रिम-१०११/प्र. क्र.५०/२०११/विनियम, दि.०३/०२/२०१२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या अटींचे पालन करुन त्यानुसार

संबंधितांना अग्रिमाचे वाटप करण्याची दक्षता घ्यावी. संबंधीतांना अग्रिम रक्कम अदा केल्यानंतर त्याची दिनांकित अदारोल पावती, देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक त्यांचे सेवापुस्तकात/ सेवापटात नोंद करावा आणि या कार्यालयास /शासनास व महालेखापाल-१,मुंबई /महालेखापाल-२, नागपूर/अधिदान व लेखा कार्यालय मुंबई यांना तसा अहवाल तात्काळ सादर करावा.

६. असे निर्देश देण्यात येत आहेत की, उपलब्ध करुन दिलेल्या वरील रकमेच्या खर्चाचा ताळमेळ महालेखापाल यांचे कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी/महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका प्रकरण-१४ नियम १५७ च्या परिशिष्ट ३ तसेच शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार योग्य प्रकारे व योग्यवेळी करुन त्याबाबतची प्रमाणित माहिती शासनास विहित मुदतीत पाठविण्यात यावी. व त्यानुसार या कार्यालयाने मंजूर केलेल्या अग्रिमाच्या खर्च मेळ्याची प्रमाणित माहिती वेळेत महालेखापाल यांचे कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारी विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखाची राहील. उपलब्ध केलेला निधी वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२४/ प्र.क्र.३४/अर्थ-३, दि.१/०४/२०२४ मधील अटी व शर्तीच्या अधीन राहून खर्च करणे बंधनकारक राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

७. असेही निर्देश देण्यात येत आहेत की, खर्चमेळ्याची माहिती महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करुन पाठविण्याची संपूर्ण जबाबदारीही क्षेत्रीय विभागीय कार्यालय प्रमुखांची राहील व त्याप्रमाणे माहिती न पाठविणाऱ्या कार्यालयातील संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करणे भाग पडेल यांची कृपया नोंद घ्यावी. प्रमाणित न केलेली माहिती स्वीकारण्यात येणार नाही. या कारणामुळे विलंब झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रीय विभाग/कार्यालय प्रमुखाची राहील याचीही कृपया नोंद घ्यावी.

८. सदरचा खर्च सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील गृह विभाग मागणी क्र.बी - ११ मुख्यलेखाशिर्ष " ७६१०- शासकीय कर्मचारी इ.कर्जे " मधील गौणशिर्ष २०४- संगणक अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०१८५१) अन्वये खर्ची टाकण्यात यावा व वित्तीय वर्ष २०२५-२६ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सदरचा खर्च याच लेखाशिर्षाखाली नोंदविला गेला आहे, याची खातरजमा करण्याची कृपया नोंद घ्यावी.

(अभिषेक त्रिमुखे)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, म.राज्य, मुंबई

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे
पोलीस आयुक्त, पुणे शहर
अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई / प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, दादर, मुंबई
पोलीस अधीक्षक, वर्धा / अकोला / लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर / यवतमाळ / कोल्हापूर
पुणे ग्रामीण / बुलडाणा / चंद्रपूर / जळगांव
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१. पुणे / गट क्र.२. पुणे
प्राचार्य, अपांरपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर

प्रत सविनय सादर -

अपर मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, गृह विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,
मादामकामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२
(लक्षवेध:- कक्ष अधिकारी, आस्था - १)

**लेखा अनुदान २०२५-२६ मागणी क्र. बी-११, मुख्यालेखाशिर्ष ७६१० शासकीय कर्मचारी इत्यादीना कर्जे गौणशिर्ष २०४ संगणक अग्रिमाबाबत**

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | अधिकारी / कर्मचा-यांचे नांव | पत्र प्राप्त क्र. प्राप्त झाल्याचा दिनांक | रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | विपोमनि, विशेष सुरक्षा विभाग, दादर , मुंबई | पोना/१२४४, नितीन सोमनान मासुळे | विपोमनि/विसुवि/आस्था-२अ/संगणक अग्रिम/२०२५/२८६९, दि. १८/०७/२०२५ | २०००० |
| २ | समादेशक, रारापोबल, गट क्र.२, पुणे | असई/२५३, रविंद्र मारूती वाळके | लेखा-३/मोटार वाहन अग्रिम/२०२५/१०३४, दि. १८/०७/२०२५ | २०००० |
| ३ | समादेशक, रारापोबल, गट क्र.१, पुणे | सपोना/१३१, चेतन तानाजी दमामे | लेखा-३/मोटार वाहन अग्रिम/७१०१/२०२५, दि. ३०/०७/२०२५ | २०००० |
| | | सपोना/३४२, अमोल पांडुरंग महारनवर | | २०००० |
| | | सपोशि/३६६, रामेश्वर सुभाष डुकरे | | २०००० |
| ४ | पोलीस आयुक्त, पुणे शहर | मपोशि/उज्वला संजय बनसोडे | लेखा-८/मोसाअ/अनुदानमागणी/२०२४-२५, दि. ३०/०७/२०२५ | २०००० |
| | | पोशि/परशुराम मारूती कोळी | | २०००० |
| | | पोशि/राजकुमार रघुनाथ जाधव | | २०००० |
| | | वश्रेलि, राजेंद्र शिवाजीराव साळुंखे | | २०००० |
| ५ | पोलीस अधीक्षक, वर्धा | चापोशि/२३३, निकेश गुजर | पोअव/कक्ष-१६/शासकीय अग्रीम/२०२५-५५८९, दि. ०६/०८/२०२५ | २०००० |
| | | मपोशि/४४५, कोमल फुलझेले | | २०००० |
| | | मपोहवा/११६४, सुनिता चरपे | | २०००० |
| | | पोशशि/३९०, रितेश चौधरी | | २०००० |
| ६ | अपर पोलीस आयुक्त, पुणे शहर | पोशि/३६८२, अभिजीत सुरेश दळवी | अपोआ/द.प्रा.वि./अनुदान मागणी/३८५५/पुणे, दि. १२/०८/२०२५ | २०००० |
| | | मपोशि/११०००, सीमा शंकर गायकवाड | | २०००० |
| ७ | अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, मुंबई | संदिप बाबासाहेब व्होनखंडे | फोर्स वन/आस्था-१/संगणक अर्गिम/८७/२०२५/२६७०, दि. २०/०८/२०२५ | २०००० |
| ८ | पोलीस अधीक्षक, अकोला | पोका/१०५३, गोपाळ विश्राम आकोटकर | पोअअ/लेखाशाखा/संगणक अग्रीम/अनुदान मंजुरी/माहीती/२०२५/१०६४८, दि. २०/०८/२०२५ | २०००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | अपर पोलीस महासंचालक, गुअवि, पुणे | मपोहवा/सारिका रोहीदास बेलुसे | अपोमसं/गुअवि/लेखा/सीओ/संगणक खरेदी अग्रीम/५८४/२०२५, दि. २९/०८/२०२५ | २०००० |
| १० | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, छत्रपती संभाजीनगर | पोहवा/२६७, इसरार अब्दुल कुरेशी | पोअलोछसं/पशा-६/अग्रिम बाबत/२८७३/२०२५, दि. ०२/०९/२०२५ | २०००० |
| ११ | पोलीस अधीक्षक, यवतमाळ | पोशि/१७३०, अजीत चरणदास पंधरे | पोअव/लेखा/सं.अ./कक्ष-१९/२०२५, दि. ०२/०९/२०२५ | २०००० |
| | | पोशि/२६१५, परमेश्वर आश्रु दराडे | | २०००० |
| | | पोशि/१९३, कल्पेश दिगांबर चांदेकर | | २०००० |
| | | पोशि/१७३७, प्रफुल्ल पुरूषोत्तम नाईक | | २०००० |
| | | मपोशि/९८१, अश्विनी राऊत | | २०००० |
| १२ | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई | पोह/२१३१, शिवाजी श्रीधर दराडे | अपोमसं/प्रशि/लेखा-१/पोप्रेकेंम/संगणक अग्रीम/२०२५, दि. १०/०९/२०२५ | २०००० |
| | | सपोउपनि/विनायक धोंडीबा मुंज | | २०००० |
| | | पोह/३४२, ओमप्रकाश बाबुराव पवार | | २०००० |
| १३ | पोलीस अधीक्षक, कोल्हापूर | पोकाँ/१५६९, अभिजीत विलास कांबळे | लेखा/टी-१५ संगणक अग्रीम/२०२५/१७८६७, दि. २६/०९/२०२५ | २०००० |
| १४ | विपोमनि, विशेष सुरक्षा विभाग, दादर, मुंबई | पोहवा/१६८६, समाधान लक्ष्मण लोखंडे | विपोमनि/विसुवि/आस्था-२अ/संगणक अग्रिम/२०२५/४०१२, दि. ०७/१०/२०२५ | २०००० |
| | | पोहवा/३१५२, स्वप्निल त्रिबंक रोजेकर | | २०००० |
| १५ | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण | मपोशि/२७७, रेश्मा लक्ष्मण शिंदे | पशा-२/संगणक अग्रिम/२०२५, दि. ०९/१०/२०२५ | २०००० |
| | | मपोहवा/१०७०, पुनम गणेश कांबळे | | २०००० |
| | | मपोशि/८६, कांचन खुशाल टिकमकर | | २०००० |
| | | मपोहवा/२०३३, अश्विनी ज्ञानदेव शेंडगे | | २०००० |
| १६ | प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर | पोउपनि, अतुल माधवराव सातपूते | अअप्रके/प्रलि/संगणक अग्रीम/१७९१/२०२५, दि. १५/१०/२०२५ | २०००० |
| १७ | पोलीस अधीक्षक, बुलडाणा | पोकाँ/६४०, बद्रीनाथ विनायक भुमकर | पोअबु/लेखा/कक्ष-२४/संगणक अग्रीम/२०२५/१५५६६, दि. १७/१०/२०२५ | २०००० |
| | | पोकाँ/१३४९, संदीप हरीभाऊ धनवटे | | २०००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | २०००० |
| १८ | पोलीस अधीक्षक, चंद्रपूर | मपोअ/९३७, प्रतिमा चरणदास सागोरे | | २०००० |
| | | पोअ/८५७, कुणाल सुधाकर दांडेकर | | २०००० |
| | | पोअ/८६७, गितेश वासुदेवराव येलोरे | | २०००० |
| | | पोअ/८५०, सौरभ पुरूषोत्तम महाजन | | २०००० |
| | | पोहवा/२४०४, प्रमोद वसंतराव पिसे | | २०००० |
| १९ | पोलीस अधीक्षक, जळगांव | पोना/२९६४, जुबेर इकबाल शेख | ५२८/आशा-७/संगणक अग्रिम/अनुदान मागणी/१६६९/२०२५, दि:१८/११/२०२५ | २०००० |
| | | पोशि/१३७९, पंकज भगवान सोनवणे | | २०००० |
| | | सफौ/१६३, संजय युवराज महाजन | | २०००० |
| | | पोशि/१०५६, साहेबराव सुभाष कोळी | | २०००० |
| | | पोहवा/११८२, शशिकांत नारायण पाटील | | २०००० |
| | | मपोहवा/२६८०, नंदा काळु पानपाटील | | २०००० |
| | | मपोशि/२२३५, लिना मधुकर लोखंडे | | २०००० |
| | | पोहवा/२६११, सतिष रमेश पाटील | | २०००० |
| | | पोशि/१०७३, चंद्रशेखर वसंत चौधरी | | २०००० |
| | | मपोना/२२८९, तृप्ती हरी नन्नवरे | | २०००० |
| | | मपोशि/१२१७, ज्योती प्रमोदकुमार पाटील | | २०००० |
| | | सफौ/३१९९, साहिल इतबार तडवी | | २०००० |
| | | मपोशि/१६४८, आशा महेंद्र सोनवणे | | २०००० |
| | | मपोहवा/२६७८, ज्योती दगडु चव्हाण | | २०००० |
| | | मपोशि/१९०६, जयश्री देवीदास ठेंगडे | | २०००० |
| | | पोहवा/२६४, सुनिल दिपचंद राठोड | | २०००० |
| | | पोशि/१५४६, निलेश वासुदेव घुर्गे | | २०००० |
| | | पोशी/१८७०, उदय राजेद्र बोरसे | | २०००० |
| | | पोहवा/१६१५, प्रदिप चिंतामण पाटील | | |

प्रमुख यांनी त्यांच्या आस्थापनेवरील संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांचे संगणक अग्रिम मंजूरी संबंधीचे आदेश ...

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | पोलीस अधीक्षक, कोल्हापूर | पोका/६६४, सचिन आनंद जाधव | लेखा-१५/संगणक अग्रीम/२०२५/२११२००, दि. १९/११/२०२५ | २०००० |